आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक- 04.07.2025 वार- शुक्रवार

---

**<u>शाह</u>**

देशाच्या संरक्षणासाठी तिन्ही दलांच्या सेनानीना प्रशिक्षण देणारी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी ही संस्था वीर बाजीराव पेशव्यांच्या पुतळ्यासाठी योग्य स्थान असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज पुण्यात केलं. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या आवारात उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण शाह यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, यावेळी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.

युद्धाचे काही नियम कधीच कालबाह्य होत नाहीत. युद्धात देशभक्ती, समर्पण, बलिदान हि भावना असते. देशासाठी लढण्याकरता प्रशिक्षण घेणाऱ्या प्रबोधिनीतील छत्रांना बाजीरावांच्या पुतळ्यापासून प्रेरणा मिळेल, असं शहा यावेळी म्हणाले. बाजीराव पेशवे या अजिंक्य योद्धयाने २० वर्षात ४१ युद्ध जिंकली. अनेक हरलेली युद्ध त्यांनी विजयात परिवर्तित केली. इतिहास बदलण्याचा प्रयत्न केला गेला परंतु इतिहासातील या योद्ध्यांची माहिती नव्या पिढी पर्यंत पोहोचवणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमानंतर शाह यांनी एनडीए च्या छात्रांशी संवाद साधला.

**<u>शाह</u>**

देशातल्या पायाभूत सुविधा 2014 पासून मजबूत होत आहेत. देशाच्या अर्थकारणानं चौथ्या स्थानापर्यंत झेप घेतली आहे. 2036 मध्ये भारत ऑलिम्पिकचं यजमानपद मिळवेल. असा विश्वास देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुण्यात व्यक्त केला.

श्री पुणे गुजराती समाजाच्या वतीनं बनवण्यात आलेल्या जयराज स्पोर्ट्स आणि कन्वेंशन सेंटरचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, खासदार मुरलीधर मोहोळ, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जयराज स्पोर्ट्स सेंटरचे जयंत शहा यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सामाजिक योगदान देणाऱ्या गुजराती बांधवांचा गृहमंत्री शहा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भाषणात गुजराती समाजाने पुण्याच्या विकासात दिलेल्या योगदानाविषयी गौरव उद्गार काढले.

**<u>पीएचआरसी</u>**

पुण्यातल्या पीएचआरसी लाइफस्पेस हेल्थ सिटीचं भूमिपूजनही अमित शहा यांच्या हस्ते आज झालं. पीएचआरसी लाइफस्पेस हेल्थ सिटीच्या या प्रकल्पामुळे केवळ पुण्यालाच नाही तर पश्चिम महाराष्ट्राला आरोग्य सुविधा मिळणार असल्याचं प्रतिपादन अमित शहा यांनी यावेळी केलं. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात केंद्र सरकारच्या विविध योजना, कोवीड संकट काळात भारतानं जागतिक स्तरावर दिलेलं योगदान याबाबतचा आढावा घेतला.

**<u>वारीसाठी एसटी</u>**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागानं अतिरिक्त एसटी गाड्या सोडण्याचं नियोजन केलं आहे. स्वारगेटहून ३२५ अतिरिक्त गाड्या शनिवारी आणि रविवारी धावतील. पुणे विभागाच्या गाड्या अन्य शहरांसाठीही धावणार आहेत. त्यामुळे पंढरपूरला अतिरिक्त गाड्या सोडल्याचा फटका अन्य प्रवाशांना बसणार नसल्याचं पुणे एसटी विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितलं.

**<u>अंनिस</u>**

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचं स्त्रीशिक्षण, शेती, सामाजिक काम, शैक्षणिक काम, उद्योग यात मोठं योगदान आहे. नव्या पिढीत वैचारिक स्पष्टता येण्यासाठी फुले दांपत्याचं काम आदर्श ठरेल, असं प्रतिपादन शरद पवार यांनी केलं. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे 'सावित्रीबाई, जोतिबांचे शिक्षक मिचेल दांपत्य आणि स्त्रीशिक्षणातील पूर्वसूरी' या कामिल पारखे लिखित पुस्तकाचं प्रकाशन पवार यांच्या हस्ते नुकतंच झालं. त्यावेळी ते बोलत होते.

**धोकादायक वाडे**

पुणे शहरातील धोकादायक झालेले वाडे आणि जुन्या इमारती तातडीनं रिकामे करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला आहे. वाडे रिकामे करण्यासाठी आवश्यक ती मदत द्यावी, असं पत्र महापालिका आयुक्तांकडून पोलीस आयुक्तांना पाठवलं जाणार असून, त्यानंतर पोलीस बंदोबस्तात ३७ धोकादायक वाडे रिकामे करण्याचं नियोजन महापालिकेनं केलं आहे.

**मोहीम**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'वतीनं आयुक्त सुरु असलेल्या "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ" या स्वच्छता आणि आरोग्य जनजागृती मोहिमेचा प्रारंभ अटल बिहारी वाजपेयी उद्यान, पूर्णानगर इथं पार पडला. डेंग्यू आणि मलेरियासारख्या साथीच्या आजारांपासून बचावासाठी स्वच्छतेचं महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणं, प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणं हा या मोहिमेचा उद्देश आहे. या उपक्रमाच्या अनुषंगानं महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे कीटकनाशक आणि घराघरात औषध फवारणी देखील करण्यात येत आहे.

**टेनिस**

पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या वतीनं डॉक्टर सतीश ठिगळे स्मृती प्लेयर्स चषक जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धा सुरू आहेत. 13 वर्षाखालील गटात मुलांमध्ये नीरव मुळ्ये आणि मुलींमध्ये स्पृहा गुजर यांनी विजेतेपद पटकावलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज ढगाळ हवामान होतं, कमाल तापमान 29 तर किमान तापमान 22 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस होतं. उद्याही ढगाळ हवामान राहणार असून हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**नमस्कार.**